# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.06.2024** **वारःमंगळवार**

---

१.पंतप्रधानांच्या हस्ते आज शेतकरी सन्मान निधीअंतर्गंत मदतीच्या सतराव्या हप्त्याचं वाटप,

२.राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी शासन प्रयत्नशील,

३.विविध योजनांच्या अंमलबजावणीमुळं राज्यात माता मृत्यू दरात घट आणि

४.पश्चिम बंगालमध्ये कांचनगंगा एक्सप्रेसवर मालगाडी आदळल्यानं झालेल्या अपघातात नऊ जण ठार, ५० हून अधिक प्रवासी जखमी.

**<u>मदत हप्ता</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेशात वाराणसी इथं होणाऱ्या कार्यक्रमात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधीअंतर्गंत २० हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा १७ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा करणार आहेत. याचा लाभ नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. याच कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते बचत गटातील ३० हजारांहून अधिक महिलांना कृषी सखी प्रमाणपत्राचं वाटप करण्यात येणार आहे. यावेळी निवडक ५० कृषी विकास केंद्रांवरही विशेष कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार आहे. त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील नारायणगाव इथल्या कृषी विज्ञान केंद्राचा समावेश असून तिथले स्थानिक शेतकरी कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले या कार्यक्रमाला नारायणगाव इथं प्रत्यक्ष उपस्थित राहणार आहेत. हिंगोली जिल्ह्यातील तोंडापूर इथल्या कृषी विज्ञान केंद्रातही यानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे

**<u>वळसेपाटील</u>**

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचं राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी काल पुण्यात सांगितलं. राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यासाठी साखर संकुलात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बँकांना विविध योजनांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याबाबत शासन आग्रही आणि सकारात्मक आहे, अशी माहिती वळसे पाटील यांनी यावेळी दिली.

आर्थिक अडचणीत असलेल्या जिल्हा सहकारी बँकांना अडचणीतून बाहेर काढून त्याचा अधिकाधिक नागरिकांना लाभ होण्याच्या दृष्टीनं प्रस्ताव तयार करावा, आर्थिक संकटात असलेल्या नागपूर आणि नाशिक या जिल्हा या बँकांची स्थिती सुधारण्यासाठी वेगळी योजना राबविण्याबाबत विचार करण्यात यावा, अशा सूचना वळसे पाटील यांनी बैठकीत दिल्या.

**<u>माता मृत्यू घट</u>**

प्रधानमंत्री सुरक्षा मातृत्व अभियान, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना आणि मुलांसाठीचा पोषण अभियान जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना अशासारख्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे राज्याच्या माता मृत्यू दरात घट झाली आहे. राज्यातील माता मृत्यूंची संख्या गेल्या वर्षभरात १ हजार २१७ वरून १ हजार १२७ पर्यंत कमी झाली आहे. माता मृत्यू दर कमी व्हावा यासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांतर्गत शासनाकडून प्रत्येक माता मृत्यूचं विश्लेषण केलं जात आहे. प्रत्येक माता मृत्यू टळावा यासाठी प्रयत्न असल्याचं आरोग्य विभागाच्या सहसंचालक डॉक्टर बबिता कमलापुरकर यांनी सांगितलं.

**रेल्वेअपघात**

पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग जिल्ह्यात रंगापानी रेल्वे स्थानकाजवळ काल सकाळी कांचनगंगा एक्सप्रेसला मालगाडीनं पाठीमागून धडक दिल्यानं झालेल्या अपघातात नऊ जण ठार झाले असून, ५० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. मालगाडीच्या धडकेमुळं कांचनगंगा एक्सप्रेसचे काही डबे रुळावरुन घसरल्यानं ही दुर्घटना घडली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. अपघातातील मृतांच्या वारसांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून दोन लाखांची, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

दरम्यान, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी अपघातस्थळाला भेट देऊन बचावकार्याची पाहणी केली, तसंच रुग्णालयात जाऊन जखमींची चौकशी केली. रेल्वेमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपये तर गंभीर जखमींना अडीच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. या अपघाताच्या पार्श्वभूमीवर ईशान्येकडे जाणाऱ्या मार्गावरच्या अनेक रेल्वेगाड्या काल रद्द करण्यात आल्या.

**महाराष्ट्रपर्यटक**

दरम्यान सिक्कीम मधील लॅच्युन्ग व्हॅली इथं मुसळधार पावसामुळे दरड कोसळल्यानं अडकलेल्या राज्यातील पर्यटकांची सुटका करून त्यांना वायुदलाच्या विशेष हेलिकॉप्टरनं गंगटोक इथं सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं. दरड कोसळल्यानं अडकलेल्या पर्यटकांमध्ये राज्यातील पर्यटकदेखील असल्याची बातमी समजल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तत्काळ त्याची दखल घेऊन राज्यातील पर्यटकांना सुखरूप परत आणण्याचे निर्देश राज्य प्रशासनाला दिले होते. याशिवाय सिक्कीम सरकारमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांशीही त्यांनी संपर्क साधून त्यांना महाराष्ट्रातील पर्यटकांना मदत मिळवून देण्याची विनंती केली होती.

**मिफ**

१८व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या कालच्या तिसऱ्या दिवशी पार पडलेल्या विविध कार्यक्रमांचा अधिक वृत्तांत ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून.....

**स्क्रीप्ट-**

**मिफमध्ये काल प्रतिष्ठेच्या बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी गेल्या काही वर्षांत निवडल्या गेलेल्या काही निवडक चित्रपटांसोबत रशिया, इराण, इटली इत्यादी देशांचे तसंच भारतीय लघुपट, माहितीपट आणि ऍनिमेशनपट, ऑस्कर पुरस्कारासाठी नामांकन मिळालेले लघुपट दाखवले गेले. याअंतर्गत, भारतीय चित्रपट निर्मात्या एकता मित्तल यांनी दिग्दर्शित केलेला आणि २०२०मध्ये बर्लिन चित्रपट महोत्सवात दाखवला गेलेला 'गुमनाम दिन' हा लघुपटही दाखवण्यात आला. रोजगाराच्या शोधात बंगळुरूमध्ये आलेल्या स्थलांतरित मजुरांची आणि त्यांच्या घरच्यांची कहाणी या माहितीपटात मांडली आहे. या लघुपटाची प्रक्रिया, त्यातली भावनिक गुंतवणूक आणि मिळालेली शिकवण यावर एकता मित्तल यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. सामाजिक परिवर्तन आणण्यात माहितीपटांची भूमिका या विषयावर विख्यात कन्नड दिग्दर्शक डॉ. टी. एस. नागभरण यांनी आपले विचार मांडले. तसंच स्रीकेंद्री कथानकं, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राचा माहितीपट निर्मितीवर होणारा परिणाम इत्यादी विषयांवरची चर्चासत्रं आणि परिसंवादही काल झाले. कृत्रिम बुद्धिमत्तेवर नियमन आणण्यासाठी धोरण तयार करणं अतिशय गरजेचं असल्याचं मत या परिसंवादात सहभागी झालेल्या तज्ज्ञांनी मांडलं. ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट्स या विषयावरची कार्यशाळाही काल घेण्यात आली. तसंच निसर्गावर मानवाने केलेलं आक्रमण परिवर्तनीय आहे का, या विषयावरचा संवादात्मक कार्यक्रमही पार पडला. हा महोत्सव २१ जूनपर्यंत चालणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी, अंकिता आपटे, मुंबई.**

**ईद**

ईद ऊल अजहा अर्थात बकरी ईदचा सण राज्यात काल सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध ठिकाणच्या ईदगाह मैदानांवर सामूहिक नमाज पठण करण्यात आलं. नागपूर मध्यवर्ती कारागृहातल्या प्रार्थना भवनात जामिया अरेबीय इस्लामीया या संस्थेनं बकरी ईद निमित्त कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. लातूर शहरातल्या ईदगाह मैदानावर सामुहिक नमाजनंतर भारतासह जगभरात शांतता नांदावी म्हणून प्रार्थना करण्यात आली. नाशिक आणि मालेगाव इथंही प्रथेनुसार ईद साजरी करण्यात आली. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देऊन ईद साजरी केली.

**ओबीसी आंदोलन**

ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांची जालना जिल्ह्यातल्या वडीगोद्री इथल्या उपोषणस्थळी काल सरकारच्या शिष्टमंडळानं भेट घेतली. पालकमंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे आणि माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांनी आंदोलकांशी चर्चा करून त्यांना आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला येण्याचं आमंत्रण दिलं. मात्र, आपण स्वतः चर्चेसाठी येणार नसून आपलं शिष्टमंडळ पाठवू, असं आंदोलकांनी सांगितलं

**भाजप प्रभारी**

राज्यात यावर्षी विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यासाठी भारतीय जनता पक्षानं केंद्रीय मंत्री भुपेंद्र यादव यांची महाराष्ट्राचे निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे. तर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव राज्याचे निवडणूक सहप्रभारी म्हणून काम पाहतील. याशिवाय हरियाणा, झारखंड, जम्मू आणि काश्मिर या राज्यांच्या विधानसभा निवडणुकीसाठीही पक्षानं विविध केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि माजी मुख्यमंत्र्यांची प्रभारी आणि सहप्रभारी म्हणून नेमणूक केली आहे.

**पोलीस भरती**

राज्यातल्या विविध जिल्ह्यांच्या पोलीस दलातल्या  रिक्त पदांच्या भरतीसाठीची प्रक्रिया १९ जून म्हणजे उद्यापासून सुरू होणार आहे. यामध्ये रत्नागिरी जिल्हा पोलीस दलातील १७०, नवी मुंबईतील 185  पदांचा समावेश आहे. धुळे जिल्ह्यात  पोलीस दलातील रिक्त पदांसाठी एकंदर २ हजार ४७५ अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्ज केलेल्या उमेदवारांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये असं आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षकांनी केलं आहे.

या पोलीस भरती प्रक्रियेत बनावट उमेदवार सहभागी होऊ नयेत, यासाठी प्रत्येक टप्प्यावर चेहरा ओळख  आणि बायोमेट्रिक तपासणी केली जाणार आहे. ही भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे होणार असून त्याचं संपूर्ण चित्रीकरण करण्यात येणार आहे, असं रत्नागिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी काल या भरतीसंदर्भात घेतलेल्या पत्रकार परिषदेत स्पष्ट केलं.

**खरीप तपासणी**

भंडारा जिल्ह्यात खरीप हंगामाला सुरवात झाली असून कृषी केंद्रात बियाणे खत विक्रीसाठी उपलब्ध आहे. शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचं बियाणं आणि खतं उपलब्ध व्हावीत यासाठी सध्या भरारी पथकांमार्फत तपासणी करण्यात येत असून आतापर्यंत १०० हून अधिक कृषी केंद्राची तपासणी झाली आहे. या तपासणीत अनेक त्रुटी निदर्शनास आल्याबद्दल सात कृषी केंद्रावर कारवाई करण्यात आली आहे.

**खतं-अकोला**

अकोला जिल्ह्यात खरीप हंगामासाठी १८०० मेट्रिक टन डीएपी आणि ६०० मेट्रिक टन २०:२०:२० रासायनिक खताचा साठा मालगाडीद्वारे अकोल्याच्या रेल्वे स्थानकात पोहोचला आहे. अकोला जिल्ह्याची खतांची गरज भागवून टंचाई दूर करण्यासाठी कृषी विभागानं खतांची मागणी नोंदविली होती

**दरडपाहणी**

रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंद्र सिंह आणि जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी काल मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर चिपळूण तालुक्यातल्या परशुराम घाटातल्या दरडप्रवण क्षेत्राची पाहणी करुन खबरदारीच्या आवश्यक सूचना केल्या. पावसामुळे गेल्या आठवड्यात राजापूर तालुक्यातला अणुस्कुरा घाट, मंडणगड तालुक्यातला तुळशी-माहू घाट, तसंच खेडमध्येही काही ठिकाणी दरडी कोसळल्या होत्या.

**हवामान**

मराठवाडा आणि विदर्भात आज तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह मध्यम पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकणात तसंच मध्य महाराष्ट्राच्या घाटांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.